पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/०९/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२१/०९/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
४. मा.अश्विनी गजानन-चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०६/०९/२०१८ व दिनांक १०/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ०१
दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.संगिता भोंडवे
संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१/कावि/७३६/२०१८, दि.१४/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे माहे ऑगष्ट २०१८ व ११ सप्टेंबर २०१८ आखेरचे १० शासन निर्णय अवलोकनार्थ तसेच वाचन व चर्चेकामी शिक्षण समितीपुढे सादर करणे आवश्यक असलेने प्रस्तावा सोबतचे महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे माहे ऑगष्ट २०१८ व ११ सप्टेंबर २०१८ अखेरचे १० शासन निर्णयाचे अवलोकन करणेत आले.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – ०२
दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक : मा. संगिता भोंडवे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर
संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१/कावि/७३५/२०१८, दि.१४/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमाच्या एकूण १०५ शाळा असून या शाळांच्या एकूण ८८ इमारती आहेत. तसेच खाजगी शाळा, अनुदानीत शाळा, कायम विनाअनुदानीत शाळा, स्वंयम अनुदानीत शाळा या शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांना मनपा अंतर्गत सर्व शाळांची वार्षीक तपासणी करुन तपासणी अहवाल कार्यालयास सादर करणे, शाळा तक्रारीबाबत पंचनामा करुन अहवाल कार्यालयास सादर करणे, मनपा/ खाजगी शाळांचे पूर्तता करुन २५ टक्के प्रवेश पात्र शाळा/विदयार्थी यादी करुन त्यांना प्रवेश मिळवून, युडाईस फॉर्म भरुन घेणे मनपा/खाजगी इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत५०टक्के फॉर्म चेक करणे, १०वी/१२वी परिक्षा भरारी पथकात काम करणे, मनपा/खाजगी शाळेतील शिक्षक मुख्याध्यापक यांचे प्रशिक्षणसंदर्भात नियोजन व नियंत्रण करणे, गोपनिय अहवाल भरुन घेणे, शाळेचे साहीत्य शाळेला पोहच झाले विदयार्थ्यांना योग्य साहीत्य प्राप्त झालेचा अहवाल देणे कार्यालयाने दिलेल्या सुचनानुसार शाळे संदर्भात कार्यवाही करणे, विदयार्थी गुणवत्ता वाढीसाठी विविध कार्यक्रम राबविणे, शाळेत वेळापत्रकानुसार तास घेतात का याबाबत खात्री करणे,शाळेतील पोषण आहार गुणवत्ता दर्जा तपासणे, सर्व विद्यार्थ्यांना आहार मिळतो का ते पाहणे, शालेय मुख्याध्यापकास रेकॉर्ड अदयावत ठेवण्यास मार्गदर्शन करणे, विषयतज्ञ व मुख्याध्यापक यांच्यावर नियंत्रण ठेवून विदयार्थी गुणवत्तावाढ करणे, इत्यादी कामकाजास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ०३
दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.संगिता भोंडवे
संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१अ/कावि/७८/२०१८, दि.१४/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

विषय – अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत...

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ०४
दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक : मा. संगिता भोंडवे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि./५/कावि/५२५/२०१८, दि.१४/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.नगरसेविका सौ.अश्विनी गजानन चिंचवडे यांचे दि.१४/०९/२०१८ चे पत्र व संस्कृती संवर्धन व विकास महासंघाचे विभाग प्रमुख श्री.डॉ.अजित जगताप यांचेकडील दिनांक १०/०९/२०१८ च्या प्राप्त पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत मनपा शाळांमध्ये पहिला व तिसरा शनिवार दप्तराविना शाळा उपक्रम राबविला जातो. त्या अंतर्गत त्या दिवशी विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षा मिळावी व योग प्राणायामातुन शरीर, मन सक्षम होऊन चांगले संस्कार व्हावेत म्हणून मोफत प्रकल्प राबवू इच्छितात या कामकाजास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६२३/२०१८
दिनांक : २१/०९/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.